चाल - माझ मरण येण्याआधी मला येडामाय दावा

........................................

खऱ्या सद्‌गुरुची, होsss होsss हो ss
ही भक्ती मिळाली ssssss
जिवंतच जीवाला या, मुक्ती मिळाली ||धृ||

जगतमाता शहशांहजींचे चरित्र
अचरीता बनले ते, जीवनाचे मित्र
गुरुभक्ती सेवा ही, स्मरिता पवित्र
अंतरी उमटले या भक्तीचे चित्र
या अध्यात्म ज्ञानाची, होsss शक्ती मिळाली ||१||
जिवंतच जीवाला या, मुक्ती मिळाली

आठवावे गुरुबचन जींचे, बलिदान
मिशन करिता वाहिले, त्यांनी पंचप्राण
चाचा प्रतापजींची सेवा महान
जगले गुरुसाठी ते, संत शीलवान
सद्‌गुरु कृपे तया, होsss तृप्ती मिळाली ||२||
जिवंतच जीवाला या, मुक्ती मिळाली

सविंदर हरदेव राजमाता आई
कोटी नमन अंमचे या, त्रिमूर्ती पायी
आहे मार्गदर्शक अंम्हा ठाई ठाई
एकनाथा जीवन हे, प्रेरणादायी
आता जीवन जगण्याची, होsss युक्ति मिळाली ||३||
जिवंतच जीवाला या, मुक्ती मिळाली